मागणी क्र.सी-६, मुख्य लेखाशीर्ष २७११ पूर नियंत्रण व जलनिस्सा:रण, ०१ पूर नियंत्रण १०३ बांधकामे (०१) (०२), कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा व भिमा खोऱ्यातील पूर नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविणे (७०% बाह्य सहाय्यित प्रकल्प- जागतिक बँक प्रकल्प कर्ज) (कार्यक्रम) २७११०९९४ अंतर्गत निधी वितरण.

महाराष्ट्र शासन
मदत व पुनर्वसन विभाग,
(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक :- मंनिक-२०२६/प्र.क्र.६६/ मंनिक-०२,(ई-१६७७५६५)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ४ ऑगस्ट, २०२६

वाचा- १) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पूरक-२०२६/प्र.क.५५/अर्थ-३, दि.०३.०७.२०२६
२) मित्र कार्यालयाचे पत्र क्र. मित्र/उपक्रम/प्र.क्र.४३/२०२५, दि.२१.०५.२०२६
३) मित्र कार्यालयाचे पत्र क्र. मित्र/उपक्रम/प्र.क्र.६३/२०२६, दि.१०.०७.२०२६

प्रस्तावना :

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा- भीमा खोऱ्यातील पूरनियंत्रणाकरिता जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमातील कामे कार्यान्वित करण्यात आली असून प्रकल्प अंतिम वाटाघाटी स्तरावर आहे. मित्र कार्यालयाकडून प्राप्त पत्रान्वये MRDP अंतर्गत राधानगरी प्रकल्पाच्या सांडव्याचे नुतनीकरण करण्यासाठी, वन्यजीव संरक्षणासाठी मूळ प्रकल्पाच्या किंमतीच्या २% निधी वन विभागास हस्तांतरित करावयाचा असल्याने रुपये १.७७ कोटी निधीची मागणी करण्यात आली आहे. त्यापैकी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील "३१- सहाय्यक अनुदाने" या उद्दीष्टांतर्गत मंजूर तरतूदीतून रुपये ८५.८८ लक्ष तरतूद मित्र कार्यालयास यापूर्वी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सन २०२६ च्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून रुपये ९१,६०,५००/- इतकी तरतूद मित्र कार्यालयास उपलब्ध करुन देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय-

सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्वारे प्राप्त निधीपैकी “मागणी क्र.सी-६, मुख्य लेखाशीर्ष २७११- पूर नियंत्रण व जलनिसा:रण, ०१ पूर नियंत्रण १०३ बांधकामे (०१) (०२), कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा व भिमा खोऱ्यातील पूर नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविणे (७०% बाह्य सहाय्यित प्रकल्प- जागतिक बँक प्रकल्प कर्ज) (कार्यक्रम) २७११०९९४” या लेखाशीर्षाखाली "३१- सहायक अनुदाने" या उद्दीष्टांतर्गत रु.९१,६०,५००/-(रुपये एक्क्यान्नव लाख साठ हजार पाचशे फक्त) इतका निधी मित्र कार्यालयास वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

०२.	सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४१७/२०२६/व्यय-९ दि.२८.०७.२०२६ अन्वये देण्यात आलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

०३.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८०४१७२२३७७४४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by BAGUL SMITA SANJAY
Date: 2026.08.04 17:23:28 +05'30'

(स्मिता बागुल)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (आपत्ती व्यवस्थापन) यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र
३. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
४. सह मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र
५. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
७. महालेखापाल (लेखापरीक्षा), मुंबई/ नागपूर.
८. सह सचिव तथा वित्तीय सल्लागार, आ.व्य., म. व पु. वि., मंत्रालय, मुंबई.
९. लेखाधिकारी, (आव्यप्र-६), आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती, मंनिक-०२.